# श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व
# डॉ.वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर-४१३००३

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४९४०१, Email- deansolapur@gmail.com

## @ जाहिरात @

अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णाल, सोलापूर या संस्थेत महात्मा ज्योतीबा जन आयोग्य योजनांतर्गत डायलेसीस तंत्रज्ञ पदासाठी कंत्राटी पध्दतीने (Contract Basis) रिक्त असलेल्या जागेसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत असून सदरची जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून दिनांक ०५/०६ /२०१८ पर्यंत दुपारी ५.०० वाजेपर्यंत पात्र उमेदवाराकडून आवश्यक त्या कागदपत्रासह विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर विहीत नमुन्यातील अर्ज उमेदवारांना महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनांतर्गत कार्यालयात अथवा अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर येथून व्यक्तीशः उपलब्ध होतील. उमेदवारांनी यांची नोंद घ्यावी की, प्रतिनिधींना (Proxy) अर्ज दिले जाणार नाही व अशा प्रसंगी अर्ज अवैध ठरविले जातील. अर्ज स्वीकारण्याचे ठिकाणी अधिष्ठाता कार्यालय, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर (पोच घ्यावी)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पदाचे नाव | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता व अनुभव | एकत्रित ठोक वेतन (Consolidated Pay) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर | डायलेसीस तंत्रज्ञ | ०२ | प्रथम प्राधान्य डायलेसीस टेक्नॉलॉजीचा डिप्लोमा किंवा डिग्री.<br>व्दीतीय प्राधान्य बीएसस्सी व डायलेसीस युनिट मधील अनुभव.<br>तृतीय प्राधान्य बीएसस्सी नर्सिग<br>चौथे प्राधान्य जीएनएम<br>पाचवे प्राधान्य बीएसस्सी व डिएमएलटी | १०,०००/- |

सूचना :-

१) वरील पदाची कमाल वयोमर्यादा ३८ असेल व ती सुयोग्य प्रकरणी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम असेल. सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास कमाल वयोमर्यादा ६२ असेल जी सुध्दा सुयोग्य प्रकरणी ६५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

२) वरील पद निव्वळ कंत्राटी स्वरुपातील असून राज्य रक्त संक्रमण परिषदेमार्फत भरण्यात येत आहे.

३) या पदासाठी प्रतीक्षायादी करण्यात येत आहे.

४) वरील पदासाठी कर्मचाऱ्यास ठोक वेतन (Consolidated Salary) देण्यात येईल.

५) उच्च शैक्षणिक अर्हता धारकास वर नमूद केलेल्या किमान अनुभवापेक्षा डायलेसीस तंत्रज्ञ कामाचा अधिक अनुभव असल्यास सदर उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

६) वरील पदाच्या उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे व मराठी लिहिता वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

७) निवड झालेल्या उमेदवारास सुरुवातीला ११ महिन्याच्या कालावधीसाठी नेमणूक दिली जाईल.

८) अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेवाराची मुलाखत घेण्यात येईल व सदर यादी मुलाखतीच्या दिवशी म्हणजेच दि. / /२०१८ रोजी सूचना फलकावर लावण्यात येईल.

९) मुलाखतीची तारीख ०७/०६/२०१८ वेळ दुपारी ४.०० वाजता असून उमेदवाराने मा.अधिष्ठता यांचे कक्षात मूळ कागदपत्रासह स्वखर्चाने हजर रहावे, त्यासाठी वेगळी मुलाखत पत्रे पाठविली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१०) उमेदवाराने चुकीची माहिती/कागदपत्रे दिल्यास उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्याची नियुक्ती समाप्त होईल.

११) करार पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारास राजीनामा द्यावयाचा असेल तर त्याने एक महिन्याची आगाऊ नोटीस मा. अधिष्ठाता यांना रक्तपेढी प्रमुखांमार्फत देणे आवश्यक आहे.

१२) करार पध्दतीवर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजाचा अहवाल असामाधानकारक प्राप्त झाल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येतील. तसेच हे उमेदवार संबंधित विभागाचे विभागप्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली काम करतील. या उमेदवारांना नियमीत उमेदवाराप्रमाणे पुर्ण वेळ काम करणे बंधनकारक राहील.

१३) करार पध्दतीवर नियुक्त केलेल्या उमेदवारांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. तसेच करार पध्दतीवर काम केलेल्या कालावधीसाठी सेवानिवृत्तीचे कोणतेही लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

१४) शासकीय किंवा निमशासकीय सेवेत असणाऱ्यांनी आपले अर्ज विहीत मार्गाने पाठवावेत.

१५) सदर जाहिरातीमध्ये कोणताही बदल किंवा रद्द करण्याचे अथवा निवड यादी कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांच्याकडे राहतील.

अधिष्ठाता

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,

सोलापूर